# गद्यपाठ ५

# आठवणी

## ठळक मुद्दे

या पाठात तुम्ही खालील घटकांचा अभ्यास करणार आहात-

- पाठाचे नाव : कृष्णाकाठच्या आठवणी
- साहित्य प्रकार :चरित्र/आत्मचरित्र
- आठवणी – स्थलाशी निगडित असणा-या आठवणी ,भोवतालचा निसर्ग, परिसर, त्या परिसराची वैशिष्ट्ये, परिसराशी निगडीत असलेले मानवी जीवन, चालीरीती, सण ,उत्सव इ., लक्षात राहणारे प्रसंग, घटना व व्यक्ती, या सर्वांचा साहित्यिकाच्या जीवनावर/मनावर संस्कार व परिणाम

मा.यशवंतराव चव्हाण एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व होते. महाराष्ट्र राज्याच्या घडणीत ज्यांनी बहुमोल वाटा उचलला असे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री

त्यांच्या 'ऋणानुबंध' यातून हा पाठ घेतला आहे.

यशवंतरावांविषयी अधिक माहिती वाचण्यासाठी पुढील लिंक उघडा-

http://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AF%E0%A4%B6%E0%A4%B5%E0%A4%82%E0%A4%A4%E0%A4%B0%E0%A4%BE%E0%A4%B5_%E0%A4%9A%E0%A4%B5%E0%A5%8D%E0%A4%B9%E0%A4%BE%E0%A4%A3

चरित्र/आत्मचरित्र लिहिताना व्यक्तीने जे जीवन व्यतीत केलेले असते, त्याला जे अनुभव आलेले असतात, त्या संदर्भात त्याचे विचार, त्याची मते व्यक्त होत असतात.या साहित्य प्रकारात कित्येकदा बालपणापासून वेध घेतलेला असतो.'रम्य ते बालपण' असे म्हणतात. बालपणात ही रम्यता कशाकशाने येते ह्याचा शोध घ्यायचा झाला, तर प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात काही समान तर काही वेगळया प्रतिक्रिया उमटतील. पण बालपण जर आनंदात गेले असेल तर त्या गावच्या आठवणींना आयुष्यात वेगळेच स्थान असते आणि अशा 'गावाच्या' आठवणींना चित्रित करण्याचा मोह हा लेखकांना होतो. अशाच आठवणींना दिलेला उजाळा या पाठात वाचा आणि त्याचे महत्व समजून घ्या.

तुम्ही पाठ वाचलात. आता त्यातून आनंद घेताना जाणवणा-या बाबी नोंदवू या. कृष्णाकाठच्या आठवणींमध्ये कशाकशाचे चित्रण आले आहे?

अ..**स्थलवर्णन** – यामध्ये लेखकाने अनेक ठिकाणी घालविलेल्या क्षणांचे वर्णन येते.

1.**कृष्णा आणि कोयना या नद्यांचा संगमाचे स्थान-** लेखक याला प्रीतिसंगम म्हणतात. दोन्ही नद्यांमुळे या भौगोलिक परिसराचे जे सोने झाले, त्याचे वर्णन येते. तेथील सुबत्ता, त्यांचा प्रवाह, त्यांच्या आसमंतात असलेली निसर्ग संपदा यांचे लेखक भरभरून कौतुक करतात. पाण्याची विविध रूपे साकारतात.

या सर्वांमुळे लेखकांचे जीवन समृद्ध कसे झाले त्याचेही वर्णन आपल्याला अनुभव समृद्ध करते.या संगमाच्या ठिकाणी उभे राहिल्यावर लेखाकांना जे विचार सुचतात, ते आपल्यालाही अंतर्मुख म्हणजे विचार करायला लावतात.

२.**कृष्णाकाठ –**भरपूर पाण्यामुळे काठाभोवती आलेले संपन्न जीवन, डवरलेली पिके, काठाच्या बाजूने गेल्यास जाणवणारी निसर्ग सौंदर्याची विविधता, तेथे राहणारी माणसे व त्यांचे समृद्ध सांस्कृतिक जीवन, त्यांच्या चालीरीती यांच्या चित्रणातून तेथील परिसर डोळयासमोर उभा राहतो.

३. **पाच नद्यांचे उगमस्थान –** या उगमस्थानापासून पुढे या नद्यांचे  जे विविध प्रवाह होतात त्यांची वैशिष्ट्ये सांगणारी वर्णनात जिवंतपणा आहे व नद्यांचे पावित्र्यही जाणवते,

४. **मेणवली –** नाना फडणवीस यांच्या वाड्याच्या ऐतिहासिक वास्तू बरोबर तेथील कृष्णेच्या काठाचे दर्शन लेखकांना मोहवते.

५.**आगाशिव डोंगर –** श्रावण आणि या डोंगराशी जडलेल्या आठवणी, धार्मिक स्थल व त्याबरोबर निगडीत असलेल्या मित्रांबरोबरचे आनंददायी क्षण, स्थळाबरोबर जोडलेल्या थोर लोकांच्या आठवणी या सर्वांच्या वर्णनातून लेखकांची त्या परिसराशी असलेले आत्मीयतेचे नाते उलगडते.

६.**गड, किल्ले ,शेते –** मराठी माणसांच्या जीवनात या ठिकाणांचे असणारे ऐतिहासिक महत्त्व, तेथील निसर्ग,धार्मिक संदर्भ यांच्या आठवणी एकत्रितपणे आपल्यावर परिणाम करतात.,

**या आठवणींमधून लेखकांचे दिसून येणारे व्यक्तिमत्त्व-** लेखकाचे साहित्य हे एक प्रकारे लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब असते असे म्हणतात. यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्वाचे कोणते पैलू तुम्हाला दिसतात?

स्थळांबरोबर, व्यक्तींबरोबर जडलेले नाते, आत्मीयता व जिव्हाळा दिसून येतो.

अत्यंत तरलतेने केलेल्या वर्णनावरून सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा प्रत्यय येतो.

स्थल वर्णन करताना लेखकांनी दोन पातळयांवर केले आहे.- १.प्रत्यक्ष वर्णन , २.त्या स्थळाचा मनावर झालेला परिणाम, त्या वेळेला उठलेले भावतरंग, विचार यांचे उल्लेख

मुंबईमध्ये मानमरातब असून सुद्धा, कृष्णेची ओढ., निसर्गाचे आकर्षण, तेथील संस्कृती यांच्याशी ऋणानुबंध असल्याचे जाणवते. या मातीशी असणारे विलक्षण नाते दिसून येते.

**या पाठाव्यातिरिक्त तुमच्या पाठ्यपुस्तकातील अजून दोन पाठ आठवणी या लेखनप्रकारात मोडतात. त्याविषयी येथे क्लिक करा.**

**स्वाध्याय –**

**उजळणी प्रश्न**

अ..खालील वाक्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.

१.लक्षावधींचे जीवन संपन्न करण्यासाठी निघालेला, त्याच्या अंतर्मनात वेगाने पुढे जाण्याची ओढ असणारच!

२.निरनिराळया रंगांच्या मुद्रा उठविलेल्या पाहताक्षणीच निरागसता लक्षात यावी, पवित्र वाटावे, अशी एकूण ठेवण.

ब..खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

१.शेत पाहिल्यावर लेखकांना वारक-यांची आठवण का येत असे?

२. .कृष्णा- कोयना संगमाचा वेगळा अर्थ लेखकांच्या मनात का आला असेल?

क. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.

१.तुम्हाला लेखकांच्या वर्णनशैलीची कोणती वैशिष्ट्ये जाणवतात?

२. श्रावण आणि कृष्णामाई यांचे लेखकांच्या मनातील नाते स्पष्ट करा.

**मुक्त प्रश्न**

१.तुमच्या बालपणीच्या आठवणी वर्णन करून लिहा.(१० ते १२ ओळी)

२.निसर्ग आणि मानव यांचे अतूट नाते असते –स्पष्ट करा.

३.लेखकांनी वर्णन करताना अनेक विशेषणे आणि क्रियाविशेषणे वापरली आहेत.त्यांची नोंद करा. त्यासाठी तुम्ही स्वत:चे  वेगळे शब्द लिहा.

कृष्णाकाठ हे श्राव्यपुस्तक ऐकण्यासाठी पुढील संकेतस्थळ पहा.

https://rmvs.maharashtra.gov.in/audio/YCaudiobook.html